R.N.I.16775/68 Regd. No. MCW-126/2018-20, Published on 15th of every month.



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार

एकूण पाने १६ प्रती अंक रु. ५/-

वर्ष ५२ वे, अंक ९ वा, मुंबई. जूलै २०१९ वार्षिक वर्गणी रु. ५०/-

## ही कविता नसून औषध आहे : डिप्रेशन मधून बाहेर पडण्यासाठी

- डॉ. लक्ष्मीकांत दाणी
मो. ९८२०४ ३७०७३


माणूस काय करतो ?
कुढतो जास्त, अन रडतो कमी।
म्हणून त्याचं हृदय, धडधडत असतं नेहमी।
बोलणं कमी झाल्यामुळे, प्रश्न निर्माण झालेत।
सारं काही असूनही, एकल कोंडे झालेत।
भावनांचा कोंडमारा, होऊ देऊ नका।
हसणं आणि रडणं, दाबून ठेऊ नका।
आपल्या माणसांजवळ, व्यक्त झालं पाहिजे।
खरं खरं दुःख सांगून, मोकळं रडलं पाहिजे।
हसण्याने, रडण्याने, दबाव होतो कमी।
भावनांचा निचरा, ही Fresh होण्याची हमी।
कुणाशी तरी बोला म्हणजे, हलकं हलकं वाटेल।
दुःख जरी असलं तरी, मस्त जगावं वाटेल।
येऊद्यानं कंठ दाटून, काय फरक पडतो ?
आपल्या माणसाजवळच, गळ्यात पडून रडतो।
आपली माणसं, आपली माणसं, बाजारात मिळत नसतात।
नाती-गोती जपून ती, निर्माण करावी लागतात।
भौतिक साधनं जमवू नका, आपली माणसं जमवा।
नाहीतर तुम्ही गरीब आहात, कितीही संपत्ती कमवा।
हाय, हॅलो चे मित्रबाबा, काही कामाचे नसतात।
तुझी पाठ वळली की, कुत्सितपणे हसतात।
हसण्यासाठी, रडण्यासाठी, माणसं जपून ठेव।
नाहीतर मग घरात एखादा, 'रोबोट'' तरी आणून ठेव।
रोबोटच्याच गळ्यात पडून, हसत जा, रडत जा।
शांत झोप येण्यासाठी, दररोज गोळ्या घेत जा।
दुःख उरात दाबून वेड्या, झोप येत नसते।
हसतखेळत जगण्यासाठी माणसांचीच गरज असते,
इतून पुढे भिशी कर, हसण्याची अन रडण्याची।
हीच खरी औषधं आहेत, डिप्रेशनच्या बाहेर पडण्याची।।

......वरील कवितेचे कवी माहीत नाहीत......

जगणे म्हटले तर खूप अवघड
म्हटले तर सोपे आणि सहज
छोटे छोटे प्रसंग सांगतात सत्य-असत्य
म्हटले तर शिकवण नाहीतर नुसतीच वणवण

**मुलांना आज काय शिकविण्याची गरज आहे :** • रात्री लवकरच झोपणे व सकाळी लवकरच उठणे. • किमान ५/१० मिनिटं एका जागेवर शांत बसणे, एकाग्रता वाढविणे. • सलग एक ते दोन तास एका जागेवर बसून वाचन, लेखन, अभ्यास करण्याची सवय लावणे. • चांगल्या व आवश्यक सूचना ऐकून घेवून त्यावर विचार करण्याची सवय लावणे. • घरातील लहान मोठ्या व्यक्तींशी चर्चा, संवाद साधणे, विचारविनिमय करणे. • आपली मते घरांतील व्यक्ती, शिक्षक, सहकारीमित्र यांचे बरोबर व्यक्त करणे. • चांगले काय आणि वाईट काय याचा सारासार विचार करुन योग्य निर्णय घेण्याची क्षमता वाढविणे. • खरे काय, खोटे काय याची वास्तवाशी सांगड घालून पडताळा घेणे व सत्याच्या मार्गानेच जाणे. • व्यवहारिक दृष्ट्या योग्य काय व अयोग्य काय याची समज येणे. • अंधश्रद्धा न मानता विज्ञानाच्या आधारावर, प्रत्यक्ष पडताळा घ्यायचा प्रयत्न करणे. • मोबाईल, टी.व्ही, सोशियल मिडिया याचा कामापूरता व मर्यादित वापर करणे. • घरातील व घराबाहेरील कामे मनापासून करण्याची सवय लावणे. • शिक्षण हे

पुढील पानावर




अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाची मुखपत्रिका

**समाचार**

वर्ष ५२ वे, अंक ९ वा, जूलै २०१९

( फक्त सभासदांसाठी)

❖❖❖

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

❖❖❖

***संपादक समिती***

श्री. प्रभाकर अ. संत
डॉ. लक्ष्मीकांत दाणी
श्री. शरद पां. पारसनीस
श्री. प्रमोद नाईक
श्री. बापूराव कुलकर्णी

❖❖❖

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**

**आजीव सभासद वर्गणी ५०० रुपये**
**प्रति अंक ५ रुपये**

**दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३**

**ई मेल :** aadrbm@gmail.com
**संकेत स्थळ :** www.adrbmmahim.in


फक्त नोकरी मिळण्यासाठी व पैसे कमविण्यासाठी नसून माणूस म्हणून जगण्यास लायक बनविण्यासाठी आहे हे रुजवीणे. ● नोकरी नाही मिळाल्यास कोणताही व्यवसाय करण्याची क्षमता प्राप्त करणे. ● आपल्या कुटुंबातील, समाजातील लहान मोठ्या व्यक्तींचा आदर राखण्यास शिकविण्यासाठी शिक्षण असावे. ● जिवनांत नेहमीच आशादायी व सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करायला शिकवीणे. ● आपली क्षमता पाहून स्पर्धा करणे आवश्यक, अनावश्यक स्पर्धा टाळणे शिकणे आवश्यक. ● दुसरे करतात म्हणून आपणही तेच न करता वेगळे करण्याचा प्रयत्न करायला शिकवीणे. ● विनाकारण दुसऱ्यांना कमी लेखणे व टीका टिप्पणी करणे टाळावे. ● प्रत्येकामध्ये काही ना काही चांगले गुण असतात ते घेण्याचा प्रयत्न करायला शिकवीणे. ● परीक्षेत किती गुण मिळाले हे महत्त्वाचे नसून त्यांचेमध्ये किती नितिमुल्ये रुजली हे महत्त्वाचे आहे. ● अब्राहम लिंकनने हेडमास्तर यांना लिहिलेले पत्र किमान आठवड्यातून एकदा वाचून दाखवून त्याचा अर्थ स्पष्ट करुन सांगणे. ● साने गुरुजी यांचे शामची आई या व अशा कथा वाचून त्याचा अर्थ समजून घेण्यास शिकवीणे. ● स्वकष्टाने कमविलेल्या एका छदामची किंमत वाम मार्गाने कमविलेल्या घबाडापेक्षा किती तरी पटीने जास्त असते हे शिकणे आवश्यक आहे. ● चांगले इंग्रजी शिकला म्हणजे हुशार झाला असे नसून मातृभाषेते संस्कार व व्यवहार शिकला म्हणजे हुशार झाला. ● आजकाल या व अशाच शिक्षणाबाबत पाठपुरावा करणे आवश्यक आहे तर आणि तरच तो विद्यार्थी सर्वगुण संपन्न होईल आणि जिवन जगण्यास लायक होईल असे वाटते. ● पालक वर्गाने यांवर जरूर विचार करावा असे वाटते.


**शब्दगंध : हात**

हातात हात घेतला तर मैत्री होते.
दोन्ही हात जोडले तर भक्ती होते.
हातावर हात आपटला तर टाळी होते.
कुणाला हात दिला तर मदत होते.
कुणाला हात दाखवला तर धमकी होते.
हात वर केले तर असहाय्यता दिसते.
हातावर हात ठेवले तर निष्क्रियता दिसते.
हात पुढे केला तर मदत दिसते.
हात पसरले तर मागणी होते.
हातांचं महत्त्व इतकं
अनेक हातपुढे आले तर
अशक्य ते शक्य होते.

## देऋब्रा सोलापूर संस्थेतर्फे गुणवंतांचा गौरव

सोलापूर, ता. २: येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजातील दहावी आणि बारावीमध्ये ८० टक्क्यांपेक्षाही अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. समाजातील तसेच संस्थेच्या ज्या सभासदांच्या पाल्यांना दहावी अथवा बारावीमध्ये ८० टक्के अथवा त्यापेक्षा अधिक गूण मिळाले आहेत अशा सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी संस्थेच्या कार्यालयांत आपल्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत जमा करावी. कार्यालयाची वेळ सकाळी १० ते १२ आणि सायंकाळी ५ ते ८ अशी असून कार्यालय दूरध्वनी क्रमांक ०२१७-२७२६९९५ आहे. समाजबांधवांनी गुणपत्रिका आणून नावनोंदणी करण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले आहे.

## मध्यवर्तीचे कोषाध्यक्ष श्री. प्रदीप कुलकर्णी यांचे अकाली निधन



आखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे कोषाध्यक्ष श्री प्रदीप नारायण कुलकर्णी (वय ५९) यांचे दिनांक ५/७/२०१९, शुक्रवार रोजी पहाटे ६ वाजता निधन झाले. टिळकवाडी नेहरु रोडवरील निवासी श्री. प्रदीप कुलकर्णी यांच्या पश्चात पत्नी नीता, मुलगा संकेत, मुलगी वृषाली व जावई अमित असा परिवार आहे. स्वातंत्र्य सैनिक विठ्ठलराव याळगी यांचे ते जावई तर भाजपच्या महाराष्ट्र प्रदेशचे सचिव मुकुंद कुलकर्णी यांचे बंधू होत. त्यांना अखिल देशस्थ मध्यवर्ती मंडळातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

# भावपूर्ण श्रद्धांजली

कळविण्यास अत्यंत दुःख वाटते की अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या अतिशय कर्तव्यदक्ष, कुशल संघटक, सचोटीचे बेळगावस्थित कोषाध्यक्ष श्रीयुत प्रदीप नारायण कुलकर्णी यांचे दि. ५ जुलै २०१९ रोजी सकाळी ६ वाजता वयाच्या ५९व्या वर्षी हृदयविकाराने आकस्मिक दु;खद निधन झाले. कै. प्रदीप नारायण कुलकर्णी यांनी मध्यवर्ती मंडळाचे कोषाध्यक्ष म्हणून गेली १५ वर्षे निरलस व निस्पृह सेवा केली आहे. दरवर्षी श्रीयुत कुलकर्णी हे कमीत कमी ८० ते १०० नवीन सभासद नोंदवीत असत व बेळगावस्थित ब्राह्मण समाजातील हुशार विद्यार्थ्यांना मंडळातर्फे शैक्षणिक मदत मिळवून देण्याचे कार्य करीत असत. कित्येक वर्षे बेळगाव संस्थेच्या विद्यार्थ्यांना इतर कोणत्याही संलग्न संस्थेपेक्षा जास्तीत जास्त (कित्येक पटीने) शिष्यवृत्ती रक्कम मिळेल अशी त्यांची मेहनत असे. तसेच ते स्वतः पण आर्थिक सहाय्य देत असत. ही त्यांची समाजसेवा गेली १५ वर्षे अव्याहतपणे सुरु होती. श्रीयुत प्रदीप कुलकर्णी हे शांत, मितभाषी व मनमिळावू स्वभावाचे व हाडाचे समाजसेवक होते. मध्यवर्ती मंडळाच्या सभांमध्ये अनेक वादविवाद झाले परंतु प्रदीपने कधीही कोणाचेहि मन दुखावल्याचे किंवा त्यांनी कोणाशी चढ्या आवाजाने बोलल्याचे आमच्या तरी स्मरणात नाही. त्यांचा स्वभावच एकंदरीत मनमिळावू होता व आजपावेतो त्यांनी कोणाला दुखावले असेल असे आम्हाला स्वप्नातही आठवत नाही. या व्यक्तीने अनेक सभासदांना, त्यांच्या नातेवाईकांना खास करुन विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली आहे. अशा आमच्या लाडक्या प्रदीप कुलकर्णींना देवाने इतक्या लवकर का बोलवावे हेच आम्हाला समजत नाही. एका संलग्न संस्थेला इमारत बांधणीसाठी त्यांनी स्वतःच्या नावावर रुपये १०,००,०००/- (रुपये दहा लाख) कर्ज काढून दिले होते. आजच्या या कलीयुगात प्रदीप सारखा समाजसेवक मिळणे केवळ अशक्य आहे. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ - बेळगांव या संस्थेचे अनेक वर्ष ते कार्याध्यक्ष होते व त्यांच्या कार्यकालांत त्यांनी सभासद संख्या ३५०० वर नेली आहे. मध्यवर्ती मंडळाच्या संलग्न संस्थांपैकी सगळ्यात मोठी सभासद संख्या असलेली संस्था म्हणजे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ - बेळगांव संस्था आहे. याच्या व्यतिरिक्त श्री. प्रदीप कुलकर्णी अनेक संस्थांमध्ये पदाधिकारी होते व बेळगावमधील ब्राह्मण समाजाचे ते नेतृत्व करीत होते. विशेषतः बेळगावस्थित ब्राह्मण समाजाचा कोजागिरी उत्सव ते दरवर्षी करीत असत. फार कमी लोकांना ज्ञात असेल की श्री. प्रदीप कुलकर्णी हे बेळगाव जवळील वृद्धाश्रमाचे संस्थापक सदस्य होते व आता ते अध्यक्ष म्हणून काम पाहात होते. हे सर्व काम ते आवडीने करीत. श्रीयुत कुलकर्णी हे बृहन महाराष्ट्र मंडळाचे उपाध्यक्षही होते. कै. प्रदीप कुलकर्णी यांच्या दुःखद निधनाने संस्थेचे अपरिमित नुकसान झाले आहे. त्यांच्या निधनाने मंडळात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. कारण त्यांच्या सारखा कार्यकर्ता किंवा पदाधिकारी भविष्यात होणे शक्य नाही. ही संस्थेची तसेच कुलकर्णी कुटुंबियांचीही व्यक्तिगत हानी आहे. त्यांच्या कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखांत आम्ही सहभागी आहोत. अशा या आपल्या सर्वांच्या लाडक्या व प्रेमळ प्रदीप कुलकर्णी यांना समस्त कार्यकारी मंडळ, कार्यकारी परिषद व सर्व मध्यवर्ती सदस्यांतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. अखिल देशस्थ ऋग्वेदी मध्यवर्ती मंडळाचे सर्व सदस्य, सौ. कुलकर्णी व त्यांचा मुलगा संकेत, मुलगी वृषाली, जावई अमित व त्यांचे बंधू मा. मुकुंदराव कुलकर्णी -भा.ज.पा. महाराष्ट्र कार्यालयीन सचिव यांच्या दुःखात सहभागी आहेत.

**त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना**

**ॐ शांती शांती शांती**

## कै. ॲड. माधवराव अनगळ यांना श्रद्धांजली !

सदानंद घोटीकर, कार्यवाह, विलेपार्ले, मो.: ७०४५६५९०४५

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, विलेपार्ले या ८४ वर्षाच्या जुन्या संस्थेमध्ये एक सुप्रसिद्ध वकील दि. १२.०७.१९८६ रोजी दाखल झाले. त्या व्यक्तीचे नाव होते ॲड. माधवराव अनगळ. हे हरहुन्नरी व्यक्तीमत्त्व आपल्या संस्थेच्या भाग्यानेच आपल्याला मिळाले व त्यांनी संस्थेचे अध्यक्षपद ३१ वर्षे भूषविले. सुरुवातीच्या काळात नामवंत न्यायधीश म्हणून ते कार्यरत होते. नंतर त्यांनी स्वतःची वकीली सुरु केली आणि अल्पावधीतच त्यांनी अनेक गरजूंना कायदेविषयक सल्ला देऊन त्यांच्या अडचणी दूर केल्या. तसेच बहुतेक दाव्यांचे निकाल त्यांच्या अशिलाच्या बाजूनेच लागले हे महत्त्वाचे. अशी व्यक्ती आपल्या संस्थेत अध्यक्ष म्हणून लाभली ती अगदी त्यांचा स्वर्गवास होईपर्यंत. संस्थेच्या इतिहासात राष्ट्रीयकृत बँकेच्या विरुद्ध (पंजाब नॅशनल बँक) खटला चालविला व त्याच्यासाठी एकही रुपया संस्थेकडून मानधन घेतले नाही. असा वकील विरळाच. यातूनच त्यांच्या निस्पृहतेची आपल्याला प्रचिती येते. त्यांनी हा खटला संस्थेला जिंकून दिला आहे. त्यामुळे संस्थेची तळमजल्यावरील जागा संस्थेला परत मिळाली. ॲड. अनगळ साहेब हे मध्यवर्ती मंडळाचेही अध्यक्ष होते व त्यांची नेमणुक धर्मादाय आयुक्तांनी केली होती. मध्यवर्ती मंडळांत ज्यावेळी त्यांनी सूत्रे हातात घेतली त्यावेळी मंडळाची परिस्थिती अत्यंत बिकट होती. तसेच आवश्यक त्या गोष्टी उदा. ताळेबंद, विजेची देयके तसेच संस्थेची ईमारत अत्यंत वाईट परिस्थितीत होती. ॲड. अनगळ साहेबांनी त्यांच्या इतर सहकाऱ्यांना बरोबर घेऊन त्यात लक्षणीय बदल केले व संस्था परत नावारुपास आणली. संस्थेच्या घटनेत योग्य ते बदल करून कार्यकारी मंडळ व कार्यकारी परिषदेची स्थापना केली. आता संस्था वेगाने कामास लागली आहे. अध्यक्ष अनगळ साहेब संगीततज्ञ होते. कुठचेही गाणे लागले की ते कोणी म्हटले, कोणी लिहिले, त्याचे संगीतकार कोण, ते कोणावर चित्रीत झाले तसेच ते कोणत्या रागातले होते हे गाण्याची पहिली ओळ ऐकल्यावर लगेच सांगायचे. अनगळ साहेबांचे इतर छंद म्हणजे ते उत्कृष्ट बासरी वाजवायचे. माऊथ ऑरगन वाजवायचे तसेच ते सुंदर गाणे म्हणायचे. असे अध्यक्ष म्हणजे आमच्या सर्वांचे आधारवडच होते. त्यांची पोकळी भरुन काढणे अशक्य आहे. ते नेहमी आमच्यामागे खंबीरपणे उभे राहायचे आणि आम्हाला अनेक विषयात मार्गदर्शन करायचे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना. ओम शांति ओम.

---

## शिष्यवृत्तीसाठी उल्लेखनीय गौरवास्पद देणग्या

(१) कै. शंकर वामन देशपांडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ श्री. विवेक कृष्णा देशपांडे यांनी आजोबांच्या स्मरणार्थ रु. १,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) देणगी दिली आहे. या अंतर्गत प्रतिवर्षी इंजिनिअरींग अभ्यासक्रम घेणाऱ्या होतकरु मुंबई आणि उपनगरे पर्यंतचा रहिवासी विद्यार्थी विद्यार्थिनीस रु. ८०००/- (रुपये आठ हजार). (२) कै. केशवराव देशमुख सगरोळी यांनी दिलेल्या रु. ३०,०००/- (रुपये तीस हजार मात्र) या देणगीतून मराठी विषयांत दहावीमध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस रु. २५००/- (रु. अडीच हजार) शिष्यवृत्ती दिली जाईल.

---

## नविन सभासद

**(मंगळवेढा, जिल्हा सोलापूर)**: १) श्री. अशोक कमलाकर सुरनीस २) श्री. जयंत श्रीनिवास कुंभारे ३) सौ. ज्योत्स्ना जयंत कुंभारे ४) श्री. पंढरीनाथ भास्कर जोशी ५) सौ. विद्या विनायक मंगसुळे **कुळगांव, बदलापूर (पूर्व)**: ६) श्री. रजनीकांत यशवंत मोहरीर ७) सौ. मानसी पद्माकर चंदूरकर ८) श्री. प्रमोद प्रभाकर महाशब्दे ९) संध्या प्रदीप कुलकर्णी

१०) श्री. मकरंद सुनिल काटकर - पनवेल ११) श्री. सौरभ शरद ढेरे - पुणे १२) श्री. दिलीप शेषाद्री कुलकर्णी - ता. अंबरनाथ, १३) श्री. संग्राम विलास जोशी - नौपाडा, ठाणे १४) सौ. कलावती श्रीकांत सरडे - मुलुंड (पूर्व), मुंबई १५) श्री. रविंद्र गुडांचार्य जोशी - अक्कलकोट १६) श्री. शशीकुमार विश्वंभर कुलकर्णी - सोलापूर १७) श्री. गणेश निलकंठ कुलकर्णी - दादर (प)

## सर्व संलग्न संस्था व देणगीदारांना आवाहन

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे दहावी, बारावी, पदवी व पदव्युत्तर परीक्षेत यशस्वीरीत्या पास होणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस पारितोषिके दिली जातात. हा निधी संस्थेला समाजातील दानशूर व्यक्तींकडून मिळालेल्या देणग्यांच्या रकमेवर आधारीत आहे. सभासदांकडून मिळालेल्या ९५% देणग्या या रुपये १००/- ते ५००/- पर्यंत आहेत. प्रतिवर्षी या पारितोषिकांची रक्कम या प्रत्येक देणगीवर मिळालेल्या व्याजातून देणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत रुपये १५/- ते ५०/- मिळणारे व्याज हे अगदीच तुटपुंजे आहे. संस्थेने यापूर्वी या सर्व देणगीदारांना आवाहन केले होते की त्यांनी त्यांच्या देणगीची रक्कम किमान रुपये ५००० करावी जेणेकरून संस्थेला त्यांच्या नांवे रुपये ५००/- पर्यंतची पारितोषिकाची रक्कम देणे शक्य होईल. परंतु या आवाहनास संस्थेला कुठलाहि प्रतिसाद मिळाला नाही. अशा प्रकारचे आवाहन समाचार पत्रिकेमध्ये देखिल केले होते. त्यालाही प्रतिसाद मिळू शकला नाही. याचे एक कारण असेहि असू शकते की मिळालेल्या देणग्या ३० ते ४० वर्षापूर्वीच्या आहेत आणि बऱ्याचश्या देणगीदारांचा ठावठिकाणा नाही वा ते कदाचित हयात नसावेत. कार्यकारी मंडळाच्या सभेत श्रीयुत दिपक कुलकर्णी यांना शैक्षणिक समितीचे संयोजक म्हणून नेमण्यात आलेले आहे व त्यांच्या समवेत सदस्य म्हणून श्री. संजय कुलकर्णी, श्री. मधुकर कुलकर्णी, श्री. हरी महाशब्दे व श्री. विलास कुलकर्णी यांची या समितीवर निवड झालेली आहे. श्रीयुत दिपक कुलकर्णी यांनी वरील सर्व परिस्थितीचा विचार करून संस्थेला या विषयासंबंधी टिपण दिलेले आहे. त्यानुसार व देणगीदारांच्या इच्छेनुसार संस्थेतर्फे शैक्षणिक पारितोषिके दिली जातील. १०वी, १२वी परिक्षेंत सर्वाधिक एकूण गुण व प्रत्येक विषयांतील सर्वाधिक गुण अशा सर्व प्रकारच्या शिष्यवृत्या आहेत. शिवाय मध्यवर्ती मंडळातर्फे ८०% च्या वर गुण मिळवणाऱ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते हे लक्षांत घेऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे अर्ज संलग्न संस्थांनी शिफारशीसह पाठवावेत ही विनंती. १२ वी नंतरच्या पदविका / पदवी व पदवी पुढील शिक्षणासाठी जवळ जवळ सर्वच प्रकारच्या शैक्षणिक विभागात बहुतांशी शिष्यवृत्ती देणगीदारांनी आयोजीत केल्या आहेत. त्या शिवाय मध्यवर्ती मंडळ उर्वरीत विषयांची सुद्धा दखल घेत आहे. अनेक संलग्न संस्था अशाच प्रकारचे कार्य करीत आहेत. (सोलापूर संस्थेतर्फे होणाऱ्या गुणगौरव समारंभाचे पुढील वृत्त पहा) त्यांनी त्यांच्याकडे आलेल्या अर्जाची प्रत पाठविल्यास त्या विद्यार्थ्यांनाही मध्यवर्ती मंडळातर्फे शिष्यवृत्ती मिळू शकेल. म्हणून या सदर्भातही संलग्न संस्थांनी शिफारस अर्ज पाठवावेत. **(१) श्री. प्रभाकर कुलकर्णी, कार्याध्यक्ष (२) श्री. दिपक कुलकर्णी, शैक्षणिक समिती संयोजक (३) श्री. प्रसाद ठकार, कार्यवाह**

## विलेपार्ले संघात डॉ. आशिष देशपांडे यांचे व्यवसाय मार्गदर्शन

२९/०६/२०१९ रोजी डॉ. आशिष देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली "चहा, कॉफी, करियर आणि बरच काही" हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील काही तज्ञ आमंत्रित केले होते. १) अदिती गरवारे (केक आर्टिस्ट) २) अतुल सेठी (मॅनेजमेंट) ३) शोनित शेट्टी (फॅशन डिझायनर) (४) अंकिता गुजर (सोशॉलॉजिस्ट) (५) डॉ. सिद्धी बापट (ऑक्युपेशनल थेरपी) (६) दर्शिल मंडलीकर (मर्चंट नेव्ही) (७) क्षिती गोडसे (स्पोर्टस) (८) पुरवी भावे (डान्सर) (९) वरुण गुळवणी (आर्किटेक्ट) (१०) नारायण नीलकंटन (आय.टी. ॲण्ड् सायबर सिक्युरिटी) इ. ८वी ते १२वी मधील विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन या कार्यक्रमातील सर्व मान्यवर हे तरुण वयातील होते. आलेल्या सर्व मान्यवरांना प्रश्न विचारण्यात आले आणि त्यांनीही समाधानकारक उत्तरे दिली. सर्वांनी आपापल्या करियर विषयी माहिती दिली. सर्व मान्यवरांनी आपल्या करियरचे अनुभव सांगून उपस्थित विद्यार्थी व पालक यांना अचंबित केले. त्यांच्या अनुभव कथनानंतर त्यांना काही प्रश्न विचारण्यात आले. त्याची त्यांनी समाधानकराक उत्तरे दिली. डॉ. आशिष देशपांडे यांनी समारोपाचे वक्तव्य केले. संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. दाणी यांनी सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन कौतुक केले. राणी देसाई, मुक्ता देशमुख यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाचा लाभ १८० विद्यार्थी/विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांनी घेतला. तसेच या कार्यक्रमाबद्दल उपस्थितांनी संस्थेचे व डॉ. देशपांडे यांचे आभार मानले व भविष्यात असे कार्यक्रम संस्थेने करावे असे सुचविले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. डॉ. आशिष देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली भविष्यात सुद्धा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ विलेपार्ले संस्थेने असे कार्यक्रम करण्याचे निश्चित केले आहे.

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

## ज्येष्ठ नागरिकांना सुवर्णसंधी !

माता चॅरिटेबल ट्रस्ट, मोखाडा येथे प्रस्थापित होणाऱ्या "वरिष्ठ नागरिक वसाहत योजनेची वैशिष्ठे : १) २५० वरिष्ठ जोडप्यांची वसाहत. २५० सेल्फ कन्टेंन्ट खोल्या! २) ४५ हिंडत्या फिरत्या पुरुष्यांसाठी हॉल मध्ये सोय! प्रत्यकी १५ x १५ ची जागा! ३) ४५ आजारी पुरुषव्यक्तिंसाठी वेगळा हॉल! ४ व ५) हिंडत्या फिरत्या ४५ महिलांसाठी व आजारी ४५ महिलांसाठी वेगळे दोन हॉल! एकुण १८० व्यक्ति व २५० जोडपी म्हणजे = ६८० व्यक्ति! तर तुमच्यासाठी अतियोग्य संधी आहे! संस्थेचा हा झाला चॅरिटेबल भाग तर संस्था सेक्शन आठ कंपनी ॲक्टमध्येसुद्धा काम करणार आहे! या विभागातील दिली जाणारी सेवा ही" पेड सर्विस विथ टॅक्स असेल! श्रीमान मित्रांनो, माता चॅरिटेबल ट्रस्ट च्या मिशन प्रोजेक्ट, "वरिष्ठ नागरिक घरकुल योजनेत" रु ११०५/- देउन, रु १२५०/-प्रती चौ फुटाने घर घ्या. या योजनेत सहभागी होणे आता फार जिकरीचे राहिले नाहीं, कारण ट्रस्टच्या कामा व्यतीरीक्त सोबत आम्ही बिल्डरला आमच्या अखत्यारीतील एक एकर जमीन करारावर डेव्हलपमेंट साठी देणार आहोत, ज्यात तो प्रतेकी १६ फ्लॅट असणाऱ्या, (लिफ्टची सोय असणाऱ्या), ३ ईमारती बांधणार आहे, म्हणजे एकुण ४८ फ्लॅट, म्हणजे ५ बिल्डरांचे सर्व मिळून एकुण २४० फ्लॅट तयार होणार, ज्यास मार्केटिंग सहाय्य संस्था पुरवणार आहे! ही फ्लॅट सिस्टीम तिन प्रकारची असेल! 1) Need Home with MEDICAL SUPPORT Plus PEACEFUL Home. 2) Pride Home with Best VICINIA + Peace & Pride. 3) Intellectual Home + Peace & Pride & prestige! एकुण वसाहतीत चॅरिटी विभागात २५० जोडपे, तर सेक्शन ८ मध्ये २४० जोडपे अश्या ऐकुण ४९० जोडपी व एकट्या ९० महिला व ९० पुरुष अशी १८० जणांची सोय होणार आहे.

## पंचवीस (२५) एकर भूखंडावर ज्येष्ठांची वसाहत (वैशिष्ट्ये)

१) मोखाडा तालूका, पालघर जिल्हा. २) सर्व निवास व्यवस्था तळमजल्यावर. ३) चॅरिटेबल परवडेल असा बांधकामाचा वाजवी दर @ Rs. 1250/- Sq.Ft. ४) जोडीने वास्तव्यासाठी स्वतंत्र ४९० खोल्या. ५) वयस्क ४५ पुरुषांसाठी (१५x१५ फुट) पडद्याची जागा हॉलमधे! ६) आजारी ४५ पुरुषांसाठी (१५x१५ फुट) जागा हॉलमधे! ७) अशीच सोय महिलांसाठी उपलब्ध. ८) आयुर्वेदिक दवाखाना, प्राप्त "शारिरीक शक्ती" राखण्यासाठी! ९) जिवनपद्धती कार्यक्रमासाठी २८ खोल्यांचा वेगळा दवाखाना.

**महत्वाच्या उपलब्ध होणाऱ्या सोई:** निसर्ग सांनिध!, नक्षत्र उपवन!, व्यायाम व योग शाळा!, पांच देवालये, त्यांच्या सर्व वार्षिक ऊत्सवांसह!, वाचनालय!, डिजीटल वाचनालय!, सामाजीक चर्चेसाठी दोन हॉल!, धार्मिक उपदेशासाठी दोन हॉल!, पाहुण्यांसाठी गेस्टहाउस!, बैठ्या खेळांसाठी क्लब हॉल!, सामुहीक ईन्टरनेटची सोय!, खास आकर्षण जलतरण तलाव! नोंदणीसाठी रु. ११०५/- आज भरुन योजनेचे लाभार्थी व्हा! **संपर्क : माहादेवकर : ९४२२७६३३९६**

---

## इंजीनियरिंग साठी प्रवेश घेणाऱ्या ब्राह्मण विद्यार्थ्यांना' महत्वाची सूचना !

इंजीनियरिंग साठी प्रवेश घेणाऱ्या ब्राह्मण विद्यार्थ्यांना कळवण्यात येते की, TFWS (Tution Fee Waiver Scheme) अंतर्गत प्रत्येक इंजीनियरिंग कॉलेजला प्रत्येक बॅचसाठी DTE (Director of Technical Education) नियमानुसार ५% जागा राखीव असतात. TFWS scheme अंतर्गत विद्यार्थ्यांना कॉलेजची केवळ डेव्हलपमेंट फी भरावी लागते, कॉलेजची tuition फी पुर्णपणे माफ होते. (उदा. Csmss Engg. College Auranganad ची ब्राह्मणांसाठी फी ६८०००/- आहे. त्यात tuition fee ६१०००/- आहे, TFWS अंतर्गत ॲडमिशन घेणाऱ्यासाठी इथे केवळ ७०००/- वार्षिक फी लागते प्रत्येक कॉलेजला १००००/- पेक्षा कमीच फी लागते) ##TFWS scheme साठी वार्षिक उत्पन्न ६ लाखापेक्षा कमी लागते, त्यासाठी विद्यार्थ्यांना वार्षिक उत्पन्न (Annual Income) प्रमाणपत्र द्यावे लागते. **TFWS scheme अंतर्गत ॲडमिशन घेतल्यानंतर govt ची चालू असलेली scholarship भेटत नाही त्यामुळे OBC/SC/ST/NT विद्यार्थी याचा लाभ घेत नाहित. ब्राह्मण विद्यार्थ्यांनी या scheme चा पुरेपुर फायदा घ्यावा. आपला ब्राह्मण बांधव आर्थिक परिस्थितिमुळे इच्छा असूनही इंजीनियरिंग करू शकत नाही त्यांना खुप मोठा आधार होउ शकतो. हे जास्तीत जास्त आपल्या ब्राह्मण बांधवांपर्यन्त पोहचवा. जास्तीत जास्त शेयर करा.... ब्राह्मण विद्यार्थ्यांना TFWS scheme बद्दल काहीही अडचण असल्यास संपर्क करु शकता. - अक्षय कुलकर्णी ८२७५५८५३९३

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

## श्रीविष्णूसहस्त्रनामाच्या १२ कोटी सामूहिक आवर्तनांचा संकल्प

गीता फाऊंडेशन, मिरज तर्फे श्रीविष्णूसहस्त्रनामाच्या १२ कोटी सामूहिक आवर्तनांचा संकल्प केला आहे. हा उपक्रम १ जानेवारी २०१९ पासून सुरु झालेला आहे. याबद्दलची माहिती खालील प्रमाणे. **उद्देश :** दुसऱ्याचे निःश्रेयस करण्याची, चांगले करण्याची, त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याची वृत्ती दृढ व्हावी ही प्रार्थना. दररोज आपापल्या घरी, दिवसातून केव्हाही विष्णुसहस्त्रनामाची आवर्तने करायची. महिन्यात एकूण किमान १०८ आवर्तने अथवा दिवसाला किमान दोन आवर्तने करायची. यापेक्षा जास्त झाल्यास उत्तम. महिन्याभराची (म्हणजे दैनंदिन) आवर्तनांची नोंद ठेवायची व महिन्याच्या एकूण आवर्तनांची संख्या पुढील महिन्याच्या १५ दिवसांपर्यंत केव्हाही संस्थेला कळवायची. उपक्रमात भाग घेण्यासाठी संस्थेला खालील माहिती कळवा.

आपले संपूर्ण नाव, आपले वय, आपल्या गावाचे नांव आणि आपला मोबाईल नंबर. एक मोबाईल नंबर एकदाच एका नाव नोंदणीसाठीच वापरायचा. नाव नोंदवल्यानंतर प्रत्येकाला एक नोंदणी क्रमांक दिला जातो. तो नोंदणी क्रमांक, आपले नाव, महिना आणि आवर्तनांची संख्या संस्थेला कळवायची. या महिन्याची आवर्तनांची संख्या पुढील महिन्यात, पुढील महिन्याची आवर्तनांची संख्या त्यापुढील महिन्यात याप्रमाणे कळवत राहायचे. श्रीविष्णूसहस्त्रनामाचे स्तोत्र म्हणावे ही अपेक्षा. पण कोणी नामावली म्हटली तरी चालेल. **नाव नोंदणी व आवर्तन नोंदणीसाठी खालील नंबरवर फोन करा.** राधा : ९८६००३२०८२ / ९०२१९३८२०४ **नाव नोंदणी / आवर्तन नोंदणीसाठी तुम्ही खालील संकेतस्थळावर जाऊन स्वतः देखील नोंद करु शकता. www.shrivishnusahasranaam.com** सध्या सुमारे १२,००० जणांनी नावे नोंदवली आहेत. पण एवढ्या बळावर संकल्प पूर्ण होण्यास खूप वर्षे लागतील. संकल्पपूर्ती लवकर होण्यासाठी सभासद संख्या ४०,००० पेक्षा जास्त झाली पाहिजे. त्यासाठी आपण उपक्रमाचा खूप प्रसार करा. आपण whatsapp ग्रुप करुन त्यावर लोकांना invite करा. संस्थेला फोन करुन नाव नोंदणी करा असे आवाहन करा. उपक्रम जगभर पोहोचला पाहिजे. एकट्या महाराष्ट्रातून ४०,००० सभासद होणे अवघड नाही. सर्वांच्या सहकार्यानेच हा नामयज्ञ सफल होऊ शकतो.

---

## बडोदे संस्थेची नवी कार्यकारणी

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, बडोदे यांची वार्षिक सभा दि ३०-६-१९ रोजी श्री चंद्रशेखर रामतीर्थ यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या पार पडली. सभेत अध्यक्ष पदासाठी श्री मुकुंद काळुस्कर व सौ मंगल ऐनापुरे यांच्यात मतदान झाले व श्री मुकुंद काळुस्कर यांना अधिक मते मिळाल्याने सर्वानुमते त्यांची अध्यक्षपदी निवड झाली. सभेत ठरल्याप्रमाणे इतर पदाधिकाऱ्यांची नेमणूक दि. २-७-१९च्या कार्यकारिणीच्या बैठकीत खालील प्रमाणे करण्यात आली. श्री दत्तात्रेय वडणेरकर उपाध्यक्ष, श्री कपिल कुळकर्णी व चंद्रकांत सोलापूरकर कार्यवाह, श्री प्रदिप खिरवडकर खजीनदार तसेच श्री संतोष करंजगांवकर, श्री प्रदिप कोरान्ने, सौ मंगल ऐनापुरे, सौ गौरी काटे, सौ रेखा देवपूरकर व संदीप कोरान्ने सदस्य. मध्यवर्ती मंडळातर्फे अभिनंदन!

---

## बडोद्याच्या श्री. काळूस्कर (अध्यक्ष) यांचे अभिनंदन!

श्री काळूस्कर, अध्यक्ष, दे.ऋ.ब्रा.मंडळ, वडोदरा, मध्यवर्ती मंडळाचे आजीव सभासद आहेत. जानेवारी २०१९ ते जून २०१९ दरम्यान त्यांना खालील प्रमाणे तीन अवार्ड मिळाले आहेत. 1) 'Social Educater's Award'- by Open Page Education News Paper A'bad. January 19. 2) ' Appreciation Award ' for paper presentation in National Conference on Science and Technology of YOG . April 19 ३) मराठी वाङ्मय परिषद, बडोदे. आयोजित विज्ञान विषयक निबंध स्पर्धेत द्वितीय पारितोषिक प्राप्त. स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित, जून २०१९. मध्यवर्ती मंडळातर्फे त्यांचे अभिनंदन!

## नाशिकची कुमारी तेजस कुलकर्णी हिचे मराठी चित्रपटात पदार्पण



नाशिक - अखिल देशस्थ ऋग्वेदी मध्यवर्ती मंडळाचे कार्यकारी परिषदेचे सदस्य श्री. हेमंत (अभय) कुलकर्णी यांची कन्या व नाशिकच्या देशस्थ ऋग्वेदी संस्थेची युवक शाखा कार्यकर्ती कुमारी तेजस हेमंत (अभय) कुलकर्णी हीने बी. ई. सिव्हील पदवी संपादन केली आहे. आपला नाट्यक्षेत्राचा छंद जोपासत असतांना राज्यस्तरीय विविध नाटकामध्ये भुमिका साकारल्या आहेत.

मराठीमध्ये सध्या प्रेमकथेवर आधारीत बरेच चित्रपट येत आहेत. या चित्रपटांमध्ये आता आणखी एका चित्रपटाची भर पडली म्हणजे "तुझीच रे..." चित्रपट क्षेत्रातील प्रवीण राजा कारळे यांनी दिग्दर्शित या मराठी चित्रपटाची कथा थोडी हटके आहे. दोन अनोळखी व्यक्ती प्रेमात पडल्यावर कुटुंबीयांचा विचार न करता त्यांच्या आयुष्याचे पुढील निर्णय स्वतः घेतात. मात्र त्याचा कुटुंबियांवर विपरीत परिणाम होतो. हेच नेमकं या चित्रपटांमध्ये मांडण्यात आलं आहे. इजाबेला म्युझिक ॲन्ड एंटरटेन्मेंट निर्मित या चित्रपटात अनेक नवे चेहरे दिसणार आहेत. अभिनेत्री प्रियांका यादव, सुमुखी पेंडसे, मिलिंद गवळी, आनंदा कारेकर आदी कलाकारांच्या या चित्रपटांत महत्वाच्या भूमिका आहेत. हा चित्रपट दि. २१ जून रोजी संपुर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटामध्ये नाशिकच्या देशस्थ ऋग्वेदी संस्थेची युवक शाखा कार्यकर्ती कुमारी तेजस हेमंत (अभय) कुलकर्णी हिला काम करण्याची संधी मिळाली असून तिने सहकलाकाराची भूमिका साकारलेली आहे. तिचे मध्यवर्ती मंडळाचेवतीने आभिनंदन... व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

---



## कुमारी वेदश्री कुलकर्णी हिचे अभिनंदन

नाशिक - अखिल देशस्थ ऋग्वेदी मध्यवर्ती मंडळाचे कार्यकारी परिषदेचे सदस्य श्री. हेमंत (अभय) कुलकर्णी यांची कन्या व देशस्थ ऋग्वेदी संस्था, नाशिक संस्थेची युवक शाखा कार्यकर्ती कुमारी वेदश्री हेमंत (अभय) कुलकर्णी हिने इयत्ता १२वी सायन्स मध्ये ७५.१५ टक्के गुण मिळवुन उज्जवल यश संपादन केले आहे. तिचे मध्यवर्ती मंडळातर्फे अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

---

नेहरु कला केंद्र, वरळी, मुंबई येथे भरतनाट्य अरिंगेत्रिम नृत्याचा कार्यक्रम दिनांक १२ जून २०१९ रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात श्री. नरहरी कुलकर्णी (एन.बी.एच.) यांची नात कु. वैष्णवी कृष्णा कुलकर्णी हिने अप्रतिम नृत्य सादर केले. मध्यवर्ती मंडळातर्फे अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!



---




श्री. श्रीराम न. कुलकर्णी यांचे चिरंजीव व श्री. नरहरी कुलकर्णी यांचा नातू कु. आदित्याचे आय.सी.एस.ई. बोर्डाच्या दहावी निकालात घवघवीत यश. गणित तसेच कॉम्प्युटर विषयात पैकीच्या पैकी म्हणजे १०० टक्के गुण मिळवून त्याने हुशारीची चुणूक दाखविली. एकूण ९७.६७ टक्के गुण मिळवून त्याने परिक्षेत अभूतपूर्व यश मिळविले. त्याचा यथोचित सत्कार करण्यात आला. मध्यवर्ती मंडळातर्फे कु. आदित्य याचे अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

## मध्यवर्ती मंडळात विष्णूसहस्त्र नाम प्रवचन व पठण




२१/०६/२०१९ रोजी दुपारी ४ ते सायं ७ पर्यंत लक्ष्मीनारायण बाग हॉल, माहीम, मुंबई येथे श्री विष्णुसहस्त्रनाम प्रवचन व पठण कार्यक्रम संपन्न झाला. सौ. पूजिता बोरकर यांच्या निवेदनाने कार्यक्रमाचा आरंभ झाला. साधारण २२५ पाठकांची उपस्थिती होती. प्रारंभी अध्यक्ष श्री. विलासराव जोशी यांनी सभागृहातील श्री. लक्ष्मीनारायण व इतर देवतांना पुष्पहार अर्पण केले. त्यानंतर गीता फाऊंडेशन तर्फे अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष श्री. विलासराव जोशी, संस्थेचे जेष्ठ विश्वस्त व मार्गदर्शक श्री. हरिभाऊ जतकर आणि गीता फाऊंडेशनचे संस्थापक विश्वस्थ श्री. दिलिप आपटे मिरज तसेच गीता प्रसारक जेष्ठ श्रेष्ठ श्री. श्रीकृष्ण जोशी, मुंबई यांचा सत्कार करण्यात आला. मध्यवर्ती मंडळातर्फे मा. श्री. दिलीप आपटे, गीता फाऊंडेशन मिरज यांचा गौरव करण्यात आला.

श्री. आपटे गुरुजींनी श्रीविष्णुसहस्त्रनामाचे महत्व व महात्म्य यावर विवेचन केले. श्री. आपटे गुरुजींनी श्रीविष्णु सहस्त्रनामाते श्रीमदभगवद्गीता व श्रीमदभागवत या आपल्या सर्व श्रेष्ठ ग्रंथाची आजच्या बदललेल्या सामाजिक परिस्थितीत कशी आवश्यकता आहे हे विविध उदाहरणे देऊन स्पष्ट करुन सांगितले. या ग्रंथांची विशेष आवश्यकता शाळेतील मुले तसेच तरुण वर्गाकरता कशी आहे व त्या करता गीता फाऊंडेशन विविध स्तरावर काय कार्य करत आहे याचे विवेचन व मार्गदर्शन केले. श्री. गुरुजींचे मार्गदर्शन व तळमळीचे आंतरिक विचार यांनी सर्व उपस्थित भारावून गेले होते. गीता फाऊंडेशनच्या विविध प्रकाशनांची विक्री व्यवस्था करण्यात आली होती.

हा कार्यक्रम अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, माहीम, मुंबई व श्री. विष्णुसहस्त्रनाम सामुदायिक पठण मंडळे बोरीवली व दहिसर मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने गीता फाऊंडेशन मिरज यांच्यातर्फे आयोजित करण्यात आला होता.

## सोलापूर देऋब्रा तर्फे एक हजार वह्यांचे वाटप

सोलापूर, येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे पहिली ते नववीतील विद्यार्थ्यांना सुमारे एक हजार वह्यांचे गुरुवारी दि.२० जून रोजी वाटप करण्यात आले. फुलोरा बाल विकास वर्गाच्या संचालिका भारती देशक यांच्या हस्ते वह्यांचे वाटप झाले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, उपाध्यक्ष हरिभाऊ जतकर, शंकर कुलकर्णी, डॉ. नभा काकडे, तेजा कुलकर्णी , हेमा चिंचोळकर , सुनिल हरहरे, श्रीकांत तुळजापूरकर, विजय कुलकर्णी आदीसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सौ.देशक यांनी संस्थेच्या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. येळेगावकर यांनी ज्ञान संपादन करताना विद्यार्थ्यांनी चिकाटी व अथक प्रयत्न करण्याचे आवाहन केले. कार्यवाह श्याम जोशी यांनी सूत्रसंचालन केले. संचालक दत्तात्रय आराध्ये यांनी आभार मानले.




**सोलापूर - येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करताना भारती देशक, डॉ. श्रीकांत येळेगावकर, हरिभाऊ जतकर, शंकर कुलकर्णी, हेमा चिंचोळकर, सुनिल हरहरे व दत्तात्रया आराध्ये**

# डोंबिवलीतील 'पाळणाघराने' आयोजीत केलेल्या निबंध स्पर्धेत प्रथम पारितोषिकप्राप्त निबंध 'मूल दोघांचे - आईचे आणि बाबांचे'

- श्रीकांत सरडे,
मो. ९३२३११५४८५

'इवलेसे रोप लावियेले दारी। त्याचा वेलूं गेला गगनावरी' असे संत ज्ञानेश्वर म्हणतात. तसेच आई-बाबांना वाटत असते. आपल्या इवल्याशा रोपाचे-मुलाचे-तेज गगनापर्यंत पोहचूं दे, मुलाची किर्ती त्रिखंडात दुमदुमून जावी अशी आई आणि बाबांची अपेक्षा असते. मनीषा असते, ध्येय असते. हे ध्येय कृतीत उतरावयाचे असेल. तर अगोदर मनांतील विचार. वासनांची काळजी घेतली पाहिजे.

संस्कार देणारी आई असली तरी ते संस्कार जपणारे बाबा असतात. संयम देणारी आई असली तरी खंबीर बनविणारे बाबाच असतात. बोट धरुन चालावायला शिकविणारे आई-बाबाच असतात. काटकसरी स्वभावामुळे (आणि तो गृहीणी म्हणून आवश्यक आहे) आपल्या मुलाला नर्व्हस करणारी आई असते तर उदारपणे बालहट्ट पुरविणारा बाबाच असतो. बाबा थोर ठरतो, विशाल ठरतो. म्हणूनच कांही बाबतीत मूल आईवर नाराज असते तर बाबावर खूश असते. यातच आईचा प्रेमळपणा नी बाबांचे उत्तरदायित्व एकवटलेले दिसून येते, दिसलेही पाहिजे.

मनाच्या ईच्छा, आकांक्षा नुसते मुलाला जन्माला घालून पूर्ण होऊं शकत नाहीत. मुलाचे मन हे अत्यंत कोमल असते. त्यावेळी झालेले संस्कार संपूर्ण आयुष्यभर परिणाम करतात. या जाणिवेने योग्य संस्कार, आदर्शत्वाचे दर्शन, मोठ्याविषयी आदरभाव ठेवणे अशी शिकवण मुलाला आई-बाबाच संगनमताने, स्वतःच्या व्यवहाराने, आपल्या वैचारीक भूमिकेने देतात म्हणून मूल "घडत" असते, मनाजोगे 'वाढत' असते, मोठेपणी आई आणि बाबांना 'दाद' देते. मूल जेव्हां जन्माला येते तेव्हां त्याला 'नांव' नसते पण 'श्वास' असतो. मूलाला 'नांवारुपाला' आणणं हे आई-बाबांचं कर्तव्य असत. म्हणून प्रत्येक आई-बाबांनी मुलाशी प्रेमाने, मायेने, ममतेने सहवास ठेवावा, वाढवावा. भावना, मन, प्रतिक्रिया, भावविश्व हे एकच असतं म्हणून आई-बाबा आणि मूल (लहान-मोठं) यांचा आपापसातला 'प्रितिसंवाद' असावा, 'प्रतिसंवाद' असूं नये. हां! समाधानाचे, सामर्थ्याचे जीवन नियती घडवीत असते. तरीपण नियतीसुद्धा समन्वय साधून जीवन संजीवनपणे जगण्याची प्रेरणा आई-बाबाकडूनच मिळालेली असते. मुलांचे पुढचे आयुष्य कोणत्या गतीने कोठे जाईल हे सर्वस्वी सांगता येत नाही पण ते दिशा देऊ शकतात. जन्म आई देते नि बाबा जन्माचं सार्थक करतात. या संयोजनातूनच मुलाचे आयुष्य सफल होत असतं. मूल हे आईची माया आणि बाबांची छाया आहे. त्यामुळे मुलाच्या वर्तनावरुन आई-बाबांच्या घरातील वातावरणाचा 'उध्दार' समाज करत असतो.

'आनंद प्रत्येक क्षणाचा मुलाच्या वाट्याला यावा, फुलासारखा सुगंध नेहमी मुलाच्या जीवनात दरवळावा, मुलाला सुख मिळावे, दुःख कोसभर दूर जावे, हास्याचा मकरंद मुलाच्या जीवनात राहावा आणि प्रत्येक क्षण मुलासाठी आनंदाचाच यावा' असे प्रत्येक आई-बाबांना मनापासून वाटत असते. 'ये, गप्प बस हं, बाबा आलेत' हे सहा शब्द षड्रिपूंचा नाश करणारे, भिती, प्रिती, स्नेह, आदर, आनंद आणि शक्तीही देणारे, जगावं कसं याची प्रेरणा देणारे! म्हणून संस्कार, समन्वय, संभाषण, संतुलन, सुसंवाद, सेवाभाव या 'स' करांचा आदर्श आई-बाबांनी मुलासमोर ठेवावा.

आपलंच मूल समजून आई-बाबा कसे आहेत, कसे असावेत याचा सकारात्मक विचार केला. आता आपण बदलत्या काळातला विचार करुं या. निसर्गाचे वर्तन, वळण, विविधता काळानुरुप विचलीत होत चालली आहे. राहणीमान व्यस्त होत आहे, संवयी बदलत आहेत. सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक बरोबरच आई-बाबांचं धावपळीचं जीवनही बदलत आहे. तरीपण आपले संस्कार, संस्कृती, परंपरा बदलत नाहीत. कालानुरुप होणारे बदल म्हणजे विकासाचा टप्पा समजून मुलाच्या भवितव्यासाठी घातक ठरणार नाही अशी आई-बाबांची वागणूक, संवाद, वर्तन असावे.

मूल होण्यासाठी आज 'तो-ती' स्वतःच्या मौज-मजापासून आर्थिक परिस्थितीचा विचार करतात. मूलाच्या उज्वल भविष्यासाठी कराव्या लागणाऱ्या तरतूदीचा सामंजस्याने विचार करतात. त्यातूनच आई-बाबाना नोकरीचा विचार करावा लागतो. साहजीकच

त्यामुळे दोघेही दिवसभर घराबाहेर असतात. मग मुलाचा सांभाळ करणार कोण हा प्रश्न उभा राहातो. एकत्र कुटुंब असेल तर सहसा प्रश्न उद्भवत नाही. पण कालानुरुप 'वेगळं व्हायचंय मला' च्या वेड्या अहंकारामुळे एकत्र कुटुंबातून अनेक स्वतंत्र कुटुंब निर्माण होत आहेत, झाली आहेत. 'तो-ती' ना ठरवून आई-बाबा व्हावयाचे असते. 'ते' एक सुख भोगायची मनीषा फलद्रुप करावयाची असते. (त्यानांही त्यांच्या भावी आयुष्याचा विचार करावा लागतोच ना ?) मग दिवसभर मुलांचा सांभाळ करणार तरी कोण ? त्यासाठी एखाद्या ताईची, बाईची, 'मावशी'ची, 'आजी'ची नेमणूक करावी लागते. किंवा पाळणा घर, बेबी सिटींग आहेच. आई-बाबांनी कष्ट करुन पैसे कमवायचे-जी आज आवश्यकता आहे. आणि मूल सांभाळण्यासाठी, संगोपनासाठी, नोकरीवर जाण्यास उशीर होतो म्हणून घरी जेवण न बनवल्यामुळे बाहेरील जेवणासाठी, स्वतःच्या सर्व प्रकारच्या मौज-मजेसाठी, 'जाणिव' न आलेल्या मुलाच्या हट्टा-कौतुकासाठी कमाई संपून जाते. परिणामतः मूल आई-बाबांचे राहत नाही. तर सांभाळ करणाऱ्या 'आजी-मावशी'चे आवडते होते इतके की, प्रेमाने, आपुलकीने जरी आईने बोलाविले तरी मूल आईकडे जात नाही. उच्चघरांतील हे चित्र आपण अनुभवतो आहोत. त्यावरून आई-बाबामध्ये संघर्षाची ठिणगी पडते. त्याची ज्योत, मग मशाल केव्हा होते हे धुंदीत कळत नाही. आई-बाबांना ताण-तणावात नोकरी करावी लागते, जीवन जगावे लागते. याचा परिणाम मुलावर होत जातो. मूल हे छोटे असले तरी जन्मतःच त्याला बुद्धि, भावना, संवेदना परमेश्वराने दिलेल्या असतात. याची जाणीव 'काळ बदलला आहे' असा टेंभा मिरविणाऱ्या आणि स्वतःच्या गुर्मीत असणाऱ्या आई-बाबांना नसल्यामुळे विपरीत घटना घडतात. एवढेच काय पण कामावरुन परत येताना, पाळणाघरातून मुलाला घरी कोणी आणावयाचे या बाबतीत आई-बाबांमध्ये एक वाक्यता नसेल तर दोघांमध्ये तणाव निर्माण होतो. परिणामतः एखाद्याचा जीव घेणे प्रकारही घडूं शकतो. असे घडले आहे. हे सत्य असत्त्यात परावर्तीत करावयाचे असेल, स्वतःच्या मुलाच्या आयुष्यात विपरीत कांही घडू नये असे वाटत असेल, मुलाचे भवितव्य उज्वल, तेजस्वी करावयाचे असेल तर मूल हे आपल्या दोघांचे आहे. आपल्या दोघांच्या सद्शील विचारधारेतून जन्मले आहे याची जाणीव सदैव ठेवावी लागेल. दोघांनी समजून-उमजून वागले पाहिजे. कारण हे मूलच उद्या देशाचा नागरीक बनणार आहे, आई-बाबांचं सद्शील जपणार आहे. स्वतःच्या 'नांवा' बरोबर आई-बाबांचं 'नांव' गाजविणार आहे हे आई-बाबांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

माधुर्याचा झरा सतत शुद्ध व वाहता ठेवणे हेच सुखी संसाराचे रहस्य होय. बदलत्या काळानुसार संस्कार, संस्कृतीची, परंपरेची मोडलेली, विस्कटलेली घडी पुन्हा नीट बसविणे हाच सुखी संसाराच्या भावनात्मक ऐक्याचा तरुणोपाय आहे. आई-बाबांनी 'We step and found that life is beauty' असे न समजता 'We woke and found that life is duty' असे समजावे. After all life is an adjustment. मुलांच्या बाबतीतले कर्तव्य सामोपचाराने पूर्ण केले अशा समजूतीत उतार वय घालवावे.

**पयसा कमलं, कमलेन पयः।**

**पयसा कमलेन, विभाति तरः।।**

म्हणजे पाण्यातुळे कमळाला शोभा येते, कमळामुळे पाण्याला शोभा येते, पाणी आणि कमळ यांच्यामुळे सरोवराला शोभा येते. तद्वत आई-बाबा मूल यांचे आहे. त्यांच्यामुळेच त्यांच्या घराच्या घरपणाला शोभा येत असते.

माचीसच्या आगपेटीच्या काडीला डोकंअसतं पण मेंदू नसतो. म्हणून थोड्या घर्षणाने ती पेटून उठते आणि स्वतःच जळते. परंतु आई-बाबां जवळ तर डोकं आहे आणि मेंदूही आहे. मग त्यानी लहान-सहान गोष्टीनं पेटून कां उठावे ? शांत राहावे, स्वस्थ राहावे. आपण जगण्यासाठी आहोत, जळण्यासाठी नाही हे लक्षांत घेऊन आई-बाबांनी मुलावर सुयोग्य संस्कार करावेत आणि त्याच्या भवितण्यासाठी प्रयत्नशील असावे.

दाही दिशांतून अमृत शिंपीत, अमृतमय जाहला। समाजाप्रती क्षण क्षण जगुनि, कर्मयोगी ठरला।।

असे मुलाचे कसब, कौशल्य, कर्तव्य पाहून आई-बाबांच्या कृतार्थ जीवनाची सांगता व्हावी ही अपेक्षा व्यर्थ नसावी. आपली अपेक्षा सफल संपूर्ण होणारच.

पुनश्च मना घडवी संस्कार....

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

## बीबीएनजी, कल्याण चॅप्टरचा दुसरा वर्धापन दिन सोहळा

रविवार, २३ जून २०१९ रोजी सहकार मंदिर, कल्याण येथे बीबीएनजी, कल्याण चॅपटरचा दुसरा वर्धापन दिन सोहळा संपन्न झाला. संस्थेचे अग्रणी आणि ज्यांच्या विचारातून ही संकल्पना आकारास आली ते श्रीयुत श्रीपाद कुलकर्णी व उद्योजक श्रीयुत मुकुंद कुलकर्णी कार्यक्रमाला उपस्थित होते. ह्या कार्यक्रमाला सुमारे ६० उद्योजक ५६ तास चाललेल्या सोहळ्यात सहभागी झाले होते. नाशिक, पुणे, कल्याण, डोंबिवली, पनवेल, बदलापूर, अंबरनाथ, विलेपार्ले, बोरीवली येथून उद्योजकांनी हजेरी लावली. ७ नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उद्योजकांना भेटले व निरनिराळ्या संधी उपलब्ध होण्याचा मार्ग खुला करुन गेले.

कल्याण चॅप्टरचे वर्तमान अध्यक्ष श्रीयुत नितीन इतराज , माजी अध्यक्षा सौ. प्रीती फडके, पहिल्या अध्यक्षा सौ. डॉक्टर स्मिता तनखीवाले, कार्यवाह श्रीयुत सागर विव्दांस, कोषाध्यक्ष श्रीयुत सुशांत करंदीकर आणि पालकमंत्री (गार्डीअन) श्रीयुत जगदीश हडप ह्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यात मोलाचा वाटा उचलला. रिजनल डायरेक्टर असलेले श्रीयुत अरविंद कोरहाळकर, श्रीयुत ॲडव्होकेट महेश जोशी, डोंबिवली चॅप्टरचे अध्यक्ष श्रीयुत विवेक वामोरकर व कोषाध्यक्ष श्रेया जोशी ह्यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाला कल्याण चॅप्टरचे तमाम सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. रात्रंदिवस झटून श्रीयुत विजय चावरे, सौ. प्रीती फडके, सौ. स्मिता जोशी, सौ. सुवर्णा करंदीकर, सौ. अमृता कशाळीकर, श्रीयुत हेमंत फडके, श्रीयुत सागर विद्वांस, श्रीयुत प्रबोध तनखिवाले, श्रीयुत सुशांत करंदीकर आणि श्रीयुत मकरंद ताम्हणे ह्यांनी वेगवेगळ्या जबाबदाऱ्या समर्थपणे पेलल्या. वरील टीम ने करमणुकीचे कार्यक्रम देखील गाणी, कविता, शायरी आणि लेझीम डान्स ह्यातून सादर केले.

प्रमूख प्रायोजकांपैकी ग्रोकॉर्प ॲकेडेमीच्या वतीने श्रीयुत मकरंद पुंडलिक, सौ. अमृता कशाळीकर आणि श्रीयुत मिलिंद काणे ह्यांनी एक प्रेझेंटेशन केले. "थेट भेट" ज्याला बी टू बी असं देखिल व्यावसायिक भाषेत म्हणतात अशा पद्धतीत सगळ्या उपस्थित उद्योजकांनी एकमेकांना भेटून व्यावसायिक प्रेझेंटेशन केले.

### वधू पाहीजे

**चि. वेदप्रकाश सदाशिव पानसे (प्रथमवर)**

**जन्म तारीख :** २३/०६/१९७९ **/जन्मस्थळ :** सातारा वेळ: सायं.५.१० मि.**/रास:** वृषभ **/ नक्षत्र:** मृग **/नाडी:** मध्य/ **चरण:** पहिले **/ गण:** देव **/ उंची:** ५फुट ८इंच / र**क्त गट:** AB+ve **/ वर्ण:** गोरा **/ शिक्षण:** B.Com + G.D.C.A. + Computer Diploma + MSCIT + MS Tally/ नोकरी : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग / सहाय्यक लेखा - अधिकारी / वर्ग २ गॅझेटेड ऑफिसर / नोकरीत कायम / मा. प्रा. रु. ५०,०००/- अपेक्षा : किमान पदवीधर/नोकरी असल्यास-नसल्यास चालेल / शाकाहारी/ बहिण: भाऊ नाहीत, एकुलता एक मुलगा. वडिलः सेवानिवृत्त / आईः गृहिणी / कुटुंबाची शाखाः देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण / गोत्रः मुद्गल / आहार संपूर्ण शाकाहारी / घर सातारा येथे बांधले आहे. पालकः श्री. सदाशिव हरी पानसे, ३२८/२/३, प्लॉट नं.७, पार्वती निवास, शिवनगर, M.I.D.C., सातारा - ४१५ ००४. मो.: ९५४५५१७१४९ फोनः ०२१६२/२४८१०९ मो.: ९३२६७२६६४८ ईमेल: pansevinit@rediffmail.com

### वर पाहीजे

**अपूर्वा मोहन बहिरट**

**ब्राह्मण पोटशाखा :** देशस्थ **गोत्र :** बादरायण

जन्मतारीख : ११ जुलै १९९३ पत्रिका पाहणार.

**उंची :** ५ फुट, **रक्तगट:** A+

**आई/वडील आहेत मंगळ नाही.**

**शिक्षण :** ग्रॅज्युएट (बी.कॉम.)

**व्यवसाय :** नोकरी. **भाऊ नाही / बहिण एक विवाहीत.**

**वरसंबंधी अपेक्षा :** अनुरुप, निर्व्यसनी, मुंबई स्थित, उच्चशिक्षित, स्वतःचे घर.

**संपर्क मोबाईल:** ९८७०७१४७३०

**पत्रव्यवहारासाठी नांव व पत्ता:** सौ. सुलभा मोहन बहिरट, ३६६/२०, श्री साईनाथ हौ. सो., सेक्टर ३, चारकोप, कांदिवली (प), मुंबई - ६७.

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

## जीवनसाथी-सुयोग्य निवडीसाठी

पुनर्विवाह इच्छुक, मुंबईतील, परदेशातील
उच्च मध्यमवर्गीय, उच्चशिक्षित,
आर्मि, नेव्ही, डिफेन्स, किंचित व्यंगाची
किंवा पालकांत दोष असलेल्या स्थळांसाठी

★★★

**वेळ : रोज सकाळी ११ ते संध्याकाळी ५**

**शुक्रवारी बंद**

**संपर्क : २४३०५६०७**

**मेघा दामले**

इंद्रवदन, पद्माबाई ठक्कर रोड,
सेनाभवनसमोर, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

## श्री. शरदचन्द्र देशपाण्डे

M.A.L.L.B.

**ADVOCATE**

Asst. Secretary L.I.C. of India Z. O. Hyd. (Retired)
H. No. 8-3-978/13, Shri Nagar Colony, Hyd.

Life Member : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुम्बई
Life Member : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मण्डळ शाखा, हैद्राबाद
Life Member : मराठी ग्रंथ संग्रहालय, हैद्राबाद
Life Member : महाराष्ट्र मंडळ, तेलंगणा, हैद्राबाद
Life Member : मराठी साहित्य परिषद, तेलंगणा, हैद्राबाद
Life Member : बृहन् महाराष्ट्र मंडळ, नई दिल्ली.
Life Member : Sr. Citizen Seva Samithi, Hanuman Nagar, Hyd.
Treasurer : Sat Sri Keshav Swamy Seva Samithi, Hyd.
Life Member : Insurance Corporate Retired Employees Association
Life Member : Bharat Gunavardhak Sanstha, Hyderabad
Exe. Committee Member : Shankar Vachanalaya, Telengana, Hyd.

ISO 9001 : 2015 प्रमाणित

## समर्थ सहकारी बँक लि.सोलापूर

॥ अर्थं करी समर्थं ॥

प्रधान कार्यालय : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. फोन : ०२१७ - २७४४२१०, २७४४२१३, २७४४२१४

## २००० कोटींच्या मिश्र व्यवसायाकडे वाटचाल

✻ समर्थ बँकेच्या उपलब्ध सेवा ✻

MOBILE BANKING | RTGS/NEFT | IMPS | E-COM/POS | E- PAYMENT | FOREIGN CURRENCY EXCHANGE | LOCKERS | GAS SUBSIDY | BHARAT BILLPAY

**जेष्ठ नागरिकांसाठी व्याजदर ९% (१ वर्षासाठी)**

**३२ शाखांमधुन कार्यरत**

✻ मुंबई - दादर ०२२- २४३२४४०१/०२ ✻ कल्याण-०२५-१२२३२९११/१३ ✻ ठाणे - ०२२-२१७३७७४७/४८ ✻ वाशी - ०२२-२७८८००१४/१५
✻ पुणे - शिवाजीनगर - ०२०-२५६५७५५६/२५६५७५६५ ✻ हडपसर - ०२०-२६८९०७१२/१३ ✻ चिंचवड - ०२०-२७३७१८१८/२७३७१११९
बाणेर ०२०-२७२९२५००/०१ ✻ कोथरुड- ७२७६०८२१०१/७२७६०७२१०२ ✻ सिंहगड रोड- ९८८१७११८३० ✻ पिंपरी-०२०-२७४१२९२९/२७४१३०३०
✻ कोल्हापूर - ०२३१- २५३११४४/४५ ✻ सांगली - ०२३३- २३०२०६५/६६ ✻ मार्केट यार्ड पुणे - ०२०- २९७०६५५०/२९७०५३५०

✻ सोलापूर शहर व जिल्ह्यात एकुण १८ शाखा कार्यरत ✻

**IndusInd Bank**

My ACCOUNT
My NUMBER

# Make your Birth Date
## as your Bank Account Number.

120000111275

Our Other Innovations

Indus Mobile FINGER PRINT BANKING
Easy, Cool & Safe

VIDEO Branch

Choice Money ATM

QUICK REDEEM SERVICE

DIRECT CONNECT

CASH ON MOBILE ATM

CHECK ON CHEQUE

**For more details, please call our 24 x 7 Phone Banking Numbers : 1880 500 5004/ +91 22 4406 6666.**
**Altemately, you can visit our website : www.indusind.com**

MRH

**Mukund R. Hulyalkar**

painttech

CONSULTANTS

**Generations Technology** **Changes BUT** **HULYALKAR SAME**

Visits :

**By Appointment Only**

Available on Phone

9.00 a.m. to 6.00 p.m. (For Local)

10.30 p.m. to 11.30 p.m. (For Outstation)

**Acrylic Distemper 2 Zinc Silicate**

**Complete Paint World**

**"Choice of Bright People"**

## Mukund R. Hulyalkar - Paint Technologist

| | | |
|---|---|---|
| President | : | Deshastha Rugvedi Brahman Sangh, Dadar |
| I. P. President | : | Colour Society U.D.C.T. Mumbai |
| Secretary | : | Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| Convener | : | ISSPA Central Committee |
| Secretary | : | Govindashram Co-Op. Hsg. Society |
| Patron Member | : | Winner's Circle - Thane |
| Member | : | BIS Committee CHD 20, New Delhi |
| Award | : | Udyogshree By Maharashtra State Government / ISSP Mitra |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile : 9821099494, Tel. : 022-24456214, Fax : 022-24314865
E-mail : painttech_con@yahoo.com, Website : www.painttechconsultants.com

**R.N.I.16775/68 Regd. No. MCW-126/2018-20,** Published on 15th of every month, Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

अद्यावत नूतनीकरण केलेली

सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील

## मंगल कार्यालये

- तळमजल्यावरील कै. राधाबाई कब्बूर वातानुकूलीत अद्यावत सोयीयुक्त सभागृह
- दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह

**वैशिष्ट्ये**

वधू-वरांसाठी खोल्या, स्वयंपाकासाठी किचन

मंगल कार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय आरक्षित करा.

सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, सम्मेलन ह्यासाठी पण हॉल उपलब्ध

❖ ❖ ❖ ❖

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

दुरध्वनी : २४३० २२ ७३ / २४३० ७५७३ • **Email : aadrbm@gmail.com**


मुद्रक, प्रकाशक आणि संपादक समिती यांनी **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळा**च्या वतीने **संदीप ग्राफीक्स, ठाणे (पश्चिम)** ४०० ६०१, येथे छापून **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**, लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथून अंक प्रकाशित केला. **संपादक समिती.**